# छंद लीलावती

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४९५



REFBK-0024061
REFBK-0024061

सोपानदेव चौधरी

# छंद लीलावती

सोपानदेव चौधरी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0024061
REFBK-0024061

किंमत २१ रुपये

बुक डिव्हिजन
ज्योति पिरिऑडिकल्स, मुंबई--८३.

संदर्भ काव्य
२४९५
२४०६१
९।७२।८३

□ प्रकाशक :
सौ. ज्योति झवर
ज्योति पिरिऑडिकल्स, बुक डिव्हिजन,
१४३/४२७३, कन्नमवार नगर,
विक्रोळी, मुंबई–४०००८३

□ मुद्रक :
धीरुभाई जे. देसाई
दि स्टेट्स पीपल प्रेस, जन्मभूमि भवन,
घोगा स्ट्रीट, मुंबई–४००००१

© सौ. सुचित्रा मधुसूदन चौधरी
आनंद निवास, मांगलवाडी
जगन्नाथ शंकरशेट मार्ग, गिरगांव
मुंबई–४००००४.

□ आवरण : एकनाथ मोरे

□ प्रथमावृत्ती : १९८२.

‘कविता होण्याची’ प्रक्रिया मराठी भाषेत फारच थोड्या कवींच्या बाबतीत दिसून आली. कविवर्य सोपानदेव चौधरी ह्यांच्या बाबतीत ही प्रक्रिया अक्षरशः वयाच्या १२–१३ व्या वर्षापासून ते पंचाहत्तरीपर्यंत सतत सुरू होती.

वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी ‘झोक तोल तोल ग’ (इशारा) ही कविता लिहिली नि कै. लक्ष्मीबाई टिळकांनी ‘रत्नाकर’ मासिकात परीक्षण लिहून तिचे कौतुक केले. १९३० साली महाराष्ट्रात अवतरलेल्या काव्य-गायनाच्या युगात कवि सोपानदेव चौधरी आपल्या काव्याने आणि गायनानेही खूप लोकप्रिय झाले. ‘काव्य केतकी,’ ‘अनुपमा,’ ‘सोपानदेवी’ आणि आता ह्या ‘छंद लीलावती’ ह्या संग्रहांची काव्यसंपदा त्यांच्या नांवावर जमा असून आणखीही दोन संग्रह निघतील एवढ्या कविता त्यांच्या पोतडीत आहेत.

साहित्य संमेलनापासून ते साहित्य संपन्नांपर्यंत सर्वांनीच कवि सोपान-देव चौधरी ह्यांचे कौतुक केले. मानाचे अनेक मुजरे घेतलेल्या ह्या कवीची जीवनाकडे पाहण्याची वृत्ती प्रसन्न व सौंदर्यनिष्ठ असल्याने तो ‘ज्ञानेश्वरी’ प्रमाणे ‘मर्ढेकरी’तही रमला. चित्रपटक्षेत्रात वावरता तर महाराष्ट्राचा सैगल ठरू शकणारा हा कवि टीका–लेखनातही अनेक भाष्यकारांना आयुष्यभर वाट दाखवत राहिला.

जन्म : इ. सन १९०७ मृत्यू : दि. ४ ऑक्टोबर, १९८२

# काव्याचा 'छंद' जडविणारी 'लीलावती' !

रामायणांतील क्रौंच-वधाची कथा सुप्रसिद्धच आहे. तमसा-तीरावर स्वच्छंद काम-क्रीडा करीत असलेल्या क्रौंच-मिथुनापैकी एकाची शिकार एका निर्दय निषादाने केली... 'पाखरू ते मारणे बुद्धि खोटी' हें तो निषाद विसरला, 'हिंस्त्र श्वापदांची शिकार करण्यासाठी तेजस्वी बाण वापरावयाचे असतात; निरपराधांसाठी नव्हे' ह्याचें त्याला विस्मरण झालें. आणि त्याने क्रौंच-वधाचें पाप केलें. त्यावेळी तें करूणाजनक दृश्य पाहून वाल्मीकि-मुनींचें मन कळवळले अन् त्यांच्या मुखांतून शापवाणी प्रकटली–

**'मा निषाद प्रतिष्ठां त्वं अगम : शाश्वती समा:'** ...............

ही भावनोत्कट शापवाणी लयबद्ध होती, समचरण होती, प्रत्येक चरणांत सहजगत्या ८ अक्षरेंच होती ! आणि म्हणूनच ती 'अनुष्टुभ' नामक छंदाची जननी ठरली. सहजगत्या भावनावेगांत उच्चरलेल्या शब्दांतून एक वृत्त प्रकट व्हावे, ह्याचें वाल्मीकींनाहि नवल वाटणें स्वाभाविक होते. . .परंतु, वस्तुत: ही नवलाईची बात नव्हे. 'छंद' वा वृत्त' कसें जन्माला येते ह्याची प्रक्रियाच ह्या कथेंत सांगितली आहे. मानवाचा कोणताही आनंदाचा वा दु:खाचा उद्‌गार लयबद्धच असतो. आणि अशा लयबद्ध उद्‌गाराला विशिष्ट अक्षर-संख्येच्या अथवा गण-मात्रांच्या नियमांत बांधल्यानेच छंद निर्मिति होते. सामान्य माणसांच्या मुखातून सहज बाहेर पडणारे 'हाय-हाय ! काय करूं ?' ....' 'मजा आया, मजा आया !" इत्यादि भावनापूर्ण उद्‌गार, अथवा कडू-गोड अनुभवांचा अर्क ओतणारी एखादी म्हण, म्हणजे वस्तुत: कोणतें ना कोणतें (कधी यथास्थित तर कधी अव्यवस्थित, अन्‌रिफाइंड) वृत्तच असते, ह्याची त्या सामान्य जनांना कल्पनाहि नसते ! पण ज्यांना ह्या 'वृत्तां'चे वेड अथवा 'छंदा'चा छंद जडलेला असतो असे 'छांदिष्ट' छंद-शास्त्राच्या उभारणीस हातभार लावतात, ते 'छंदां'ची

वृत्तांची -लक्षणें ठरवितात. कांही छंदोपासक-छंद-शास्त्राचे निर्माते बनतात, कांही प्रचारक, कांही अभ्यासक.

आज रुग्णशय्येला खिळून असलेले कविवर्य सोपानदेव चौधरी हे एक निष्ठावंत छंदोपासक आहेत, छंदशास्त्री आहेत, छंद-प्रसारक 'छांदिष्ट' आहेत. त्यानी लिहिलेल्या 'छंद लीलावती' ह्या पुस्तकाच्या पहिल्या भागाची वही माझ्यासमोर आहे. ती वरवर चाळली तरी सोपानदेवांची छंद-शास्त्रप्रेम तसेंच प्राविण्य, सहज लक्षांत येते. ह्या पुस्तकांतील एकदम नजरेंत भरणारी सोपानदेवी खासियत म्हणजे त्यांनी 'मुक्तछंदा'ची उडविलेली रेवडी !

'मुक्तछंदा' विषयी 'छंदां'तच लिहावे लागल्याबद्दल क्षमा मागून सोपानदेव उपहास करतात—

**'प्रासां' चढवूंया फासावर**
**'यमकें' धाडूं यम-सदनाला**
**'यती' पाठवूं रतीकडे अन्**
**चरणा चरणा ठोकुन नाला ! . . .**
**'लघु-गुरू-मात्रा' गेल्या वाया**
**इथे न मात्रा चाले आतां . . .**
**'वृत्त' अता निवृत्त जाहले**
**नष्ट करूं या जाती आतां . . . . . .**

आणि 'मुक्तछंदा'चे लक्षण सांगतात—

**मुक्त छंद, मुक्तछंद**
**नसे त्याला धरबंध**
**गती शीघ्र, गती मंद**
**सारे कांही अंदाधुंद !**
**इथे लय जाते लया**
**बेतालाचीच किमया**

'सांगा, ऐसा बेबंदाचा
कैसा व्हावा बरें छंद? --जळ्ळे लक्षण !'

वस्तुत: 'मुक्तछंदा'ला देखील विशिष्ट लय हवी, नादवत्ता हवी, अशीच त्याच्या प्रवर्तकांची अपेक्षा होती. पण लुंग्या-सुंग्या अनुकरण-बहाद्दरांच्या हातीं हा 'मुक्त छंद' म्हणजे मर्कटांच्या हातीं कोलीत ठरला ! त्यामुळे कविता करणे 'हा बाये हातका मल' असें समजून तथाकथित नवीन काव्य गवता-ऐसे उदंड वाढले. हें अराजक आजहि कैक मासिकांच्या पानोपानी दिसून येतें. त्याची चीड सोपानदेव चौधरी ह्यांच्या सारख्या लयताल-सूर ह्यांच्यांत मुरलेल्या छंद प्रेमिकाला कां येणर नाही ? 'छंदशास्त्र' हें आपल्या सहा वेदांगांपैकी एक महत्त्वाचें शास्त्र, अशी परंपरागत श्रद्धा (यथायोग्य श्रद्धा) सोपानदेवांच्या अंगी बाणलेली आहे. ते नेहमी सांगतात "या देशाच्या पूर्णावताराने---श्री कृष्णाने-**'गायत्री छंदसामहम्'**, असे सांगून, छंद-शास्त्राचा बहुमान केला. आहे. त्याचा अवमान करणें हा ह्या नव्या पंथाचा निर्बुद्ध उद्धट-पणाच होय ! . . .आणि तें खरेंच आहे. मुक्तछंद तरी का प्रवर्तित करण्यांत आला ? तर गण-मात्रा, लघु-गुरू ह्यांच्या कांचांतून कविताकामिनी सुटावी आणि तिच्या आंतरिक आविष्काराला जास्तीत जास्त मोकळीक मिळावी म्हणून ! पण 'पृथ्वी–मंदाक्रांता, स्रग्धरा, शार्दूलविक्रीडित' इत्यादि अवघड वृत्तें वापरलीच पाहिजेत, असें कवींवर बंधन नाही. दळग दळणाऱ्या खेड्यांतील बायका, देखील जो 'ओवी-छंद' लीलया वापरूं शकतात त्यांत कविता करा ! 'ओवी-अभंगा'दि छंदांत कमीत-कमी बंधने आहेत. म्हणूनच ते जवळजवळ गद्याच्या सीमारेषेवर असल्यागत भासतात. नाना परीची अक्षरगण वृत्ते, मात्रा गणवृत्ते, सोपे सोपे छंद ह्यांनी समृद्ध झालेल्या छंद-शास्त्राकडे दुर्लक्ष करणे म्हणजे आपल्या एक बहुमोल सांस्कृतिक खजिन्याची उपेक्षा करणें होय !

**म्हणूनच, ह्या 'छंद-लीलावती' ग्रंथाचा प्रपंच सोपानदेवांनी ह्या उतार वयांतहि शिरावर घेतला. 'छंदा'च्या लक्षणगीतांतच छंदांचे नांव गुंफ-**ण्याची आणि त्या निमित्ताने त्या त्या वृत्तात चार ओळीची सुंदर कविताच

नमून्यादाखल पेश करण्याची पद्धत तशी नवीन नाही. पेशवाईंतील शाहीर रामजोशी ह्यांनी 'छंदोमंजिरी'–नामक ग्रंथांत हीच पद्धती अनुसरली आहे. उदाहरणार्थ, 'मालिनी-वृत्ता' च्या नमून्यादाखल पंढरपूरच्या माळिणींचे सुरेख वर्णन त्या वृत्तातच करून, अखेरीस शाहीर रामजोशी म्हणतात–

**"बहुत कुशल ऐशा 'मालिनी' पंढरीच्या !'**

कविवर्य माधव जूलियन ह्यांनी हीच पद्धती अधिक सामर्थ्याने नि सफाईने वापरली आहे. 'छंदोरचना' ह्या मौलिक ग्रंथाच्या निर्मितीमुळे ज्यांना 'डॉक्टरेट' मिळाली ते आधुनिक महाराष्ट्राचे महान पंडित कवि माधव जूलियन. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी 'पद्य-प्रकाश' नामक छोटेखानी पुस्तक लिहिले आहे. त्यांतील 'उपजाति' वृत्ताचे उदाहरण म्हणून दिलेला सुंदर श्लोक उदाहरणार्थ पहा–

**हा राष्ट्र-संवर्धन-काळ आला**
**समानतेच्या उभवा ध्वजाला**
**राष्ट्रीय जो सर्व धर्माभिमानी**
**न जाति तो वा 'उपजाति' मानी !**

ह्याच पद्धतीने 'छंदलीलावती'मध्ये सुमारे ८० वृत्त-छंदाची लक्षण – उदाहरणे दिली आहेत. 'भुजंगप्रयात' 'वसंततिलका' 'शिखरिणी' 'मंदार-माला' 'पृथ्वी' इत्यादि सुपरिचित वृत्तांचा तर ह्यांत समावेश आहेच. पण 'सारंग' 'रागिणी' 'मणिबंध' 'रमा' 'लंका' इत्यादि अपरिचित वृत्तांचाही परिचय करून दिला आहे. **विशेष हें कीं ह्या वृत्तांचे गण** (य र त न इत्यादि) **देखील खुबीने सांगितले आहेत.**

**'द्रुतविलंबित' वृत्त घडे तिथे**
**न भ भ र क्रम हाच गणीं जिथे**

अशा प्रकारें वृत्तांचे नांव नि गण सांगणें ही जुनी–परशुरामपंत तात्या गोडबोले ह्यांच्या जमान्याची रीत झाली ! सोपानदेव अशा मनोहारी पद्धतीचें वृत्त-परिचय करून देतात–

**न भ भरे, बघ रे घन हे किती**
**फिरत मंद गती रवि झांकिती**

द्रुतगती चपला चमके अहा !
'द्रुत-विलंबित' खेळ नभीं पहा

म्हणाल तर हा सुंदर निसर्गवर्णनपर श्लोक झाला, आणि म्हणाल तर वृत्त-नाम नि वृत्त-गण सांगणारे हे वृत्त लक्षण झाले !

'चामर' वृत्ताचें नाव नि 'र ज र ज र' हे गण सांगणारा लक्षण-श्लोकहि काव्यदृष्ट्या असाच सुरेख आहे. हा असा–

रंज रंज रंजवोनि नीलगाय काननीं
आणिला घरीं सुरेख पुच्छ-गुच्छ वेधुनी
रौप्यदंड लाभतांच भाग्य येत पामरा
भूपती-शिरीं धरीं करांत दूत "चामरा"! !

चांदीचा दांडा लाभलेल्या चवरीवरील ही एक अन्योक्तीच म्हणा ना !

परंतु, काही लक्षण श्लोकांत ही सहज सुंदरता आलेली नाही. कारण, उघडच आहे कीं 'य म न स भ ल ग' 'म स ज स त त ग' 'र न र ल ग' इत्यादि अक्षरें ओळीने, आणि तीहि रसहानि न होऊ देता आणणें हा एक अवघड हट्योगच होय. तो कधी जमणे आणि कधी बिघडणे अपरिहार्यच आहे. त्यामुळे कधी क्लिष्ट तर कधी विनोदीही रचना सोपानदेवांकडून घडली आहे. उदाहरणार्थ, 'मयूरी' वृत्ताचा लक्षण-श्लोक पहा

मेघांची दाटी हो, मेघावाणी––
'म्यौं म्यौं म्यौं गा' मोरा आता रानी !

हें 'म्यौं म्यौं म्यौं' येथे का आले तर 'म म म 'हें गण निर्देशित करण्याच्या खटपटीमुळे तसेंच 'विद्युन्माला'–वृत्ताचा लक्षण श्लोक पहा–

आभाळीची मेघाबाला
बोले मामा गा गा आला !

येथें 'म म ग ग 'हीं अक्षरें सूचित करण्यासाठी 'मामा'ला वेठीस धरले आहे, हे स्पष्ट दिसून येते ! अर्थात अशा कांही 'हठादाकृष्ट' ओळी असल्या,

तरी त्यामुळे ह्या छंद-लीलावतीची महती कमी ठरत नाही. जेथे गणवाचक अक्षरें सहजगत्या बसतच नाहीत, तेथे ती मारून-मुटकून बसविणे नाही, असें धोरण सोपानदेव चौधरी ह्यांनी यापुढे स्वीकारावें, अशी मित्रत्वाची सूचना मी करूं इच्छितो. ही सूचनाही करण्याचे कारण नाही. कारण त्यांचे कांही श्लोक केवळ वृत्तनाम गुंफूनच कृतकृत्य झालेले आहेत. येथे नमुन्याचा श्लोक सहज सुंदर रचण्याला महत्व आहे, वृत्ताची अक्षर संख्या, गण, लघु-गुरू ह्याच्या गुंफणीला फारसे महत्व देण्याचे कारण नाही.

**सोपानदेवांसारख्या संगीत-ज्ञानी मुरब्बी कविवर्याकडून अनेक चांगले श्लोक, ह्या वृत्त-परिचयाच्या निमित्ताने रसिकांना मिळाले आहेत.** उदाहरणादाखल 'फटक्या'चा हा लक्षण-श्लोक बघा–

**संसारामधि लक्ष न ज्याचे**
**परमार्थ करी जो लटका**
**विधी अशाच्या पाठीवरती**
**एक एक मारी 'फटका' '!**

'रंजन'–वृत्ताच्या लक्षण-श्लोकाची सुरुवातच किती नाद-रंजक आहे ! ही अशी––––

**गुंगत अलिगण, डोलत उपवन**
**चालत छुमछुम त्यांतच कोणी...**

अशाच प्रासादिक नादमधुरशैलींत किमान १५० निवडक नमुनेदार लक्षण श्लोक, काव्यप्रेमी रसिकांना व ह्या दुर्वृत्त जमान्यांतहि जे सुवृत्त राहूं इच्छितात त्या तरुण कवींना लाभावेत, ह्या लोभाने 'श्री सोपानदेव चौधरी ह्यांना दीर्घायुष्य नि आरोग्य लाभो' अशी त्या विश्व-काव्य-निर्मात्याला प्रार्थना करितो.

**–विद्याधर गोखले**

# मनोगत

मराठी सारस्वतांत काही विद्वानांनी काव्यांतील छंदावर लिहिले आहे. त्यांतील एक प्रमुख ग्रंथ म्हणजे कविवर्य, माधव ज्यूलियनकृत छंदोरचना! ह्या छंदोरचनेंत 'रचा सो खचा जाता नहीं' असे वाण पुष्कळच आहे. त्यात ओढून ताणून आणले असेही थोडेफार आहे. अर्थात् एवढ्या मोठ्या ग्रंथात ते क्षम्य आहे. त्यानंतर 'छंद लीलवती' ही छोटुशी ग्रंथुली मी लिहिली आहे. सार्थकता त्या त्या छंदात आलेली आहे. सहजपणे. प्रयत्नामुळे नव्हे. पोटी होते तेच ओठी आले.

कवितेच्या बाबतीत खरे असे आहे– कविता वाचून दाखवली की आपला रंग दाखवून जाते. गद्यातही आरोह-अवरोह असतात हे विसरूं नये.

फार वर्षांपूर्वी गायनाचार्य पं. बाळकृष्णबुवा कपिलेश्वर यांनी लिहिलेल्या 'श्रुतिदर्शन' या ग्रंथाला मीं प्रस्तावना लिहिली होती. श्रुति-शास्त्राचा वेध घेण्यासाठी जेवढे खोल जावे तेवढे ते अधिक विशाल दिसते. संगीत हे श्रुती-मधून म्हणजेच नादातून निर्माण होते. नादाचे दोन प्रकार आहेत. अनाहतनाद आणि आहतनाद ! आघाताशिवाय असे अनाहतनाद फक्त योगी-मुनी यांनाच ऐकायला येतात. कर्णापलिकडचे ते श्रवण म्हटले पाहिजे. असे हे विश्वसंगीत ज्याला ऐकू येते तो भाग्यवानच म्हटला पाहिजे. एरव्ही सामान्याला झालाच तर तो आभास तेवढा होत असतो. अनाहताचा आभास आणि आहताचा आभ्यस एवढेच इतरांच्या पदरी पडते. कवितेच्या बाबतीतही असेच आहे. मी भाग्यावन आहे. गायक कवि म्हणून महाराष्ट्राने मला उचलून धरले. परंतु माझ्या लहानपणापासून मी 'श्रोता' कवि होतो !'

कविता मला लहानपणापासून दिसत होती. रंग दावित होती. ऐकूं येत होती! माझी आई पू. बहिणाबाई निरक्षर होती. परंतु तिला अक्षरापलीकडले ऐकूं येत होतें. मला अक्षरांपलीकडे पाहण्याचा जो छंद जडला तो आईचे 'बोल' ऐकतां ऐकतां! पुढे योगायोगाने म्हणा, किंवा काही ठरवून म्हणा मी मुंबईत गोवर्धन संगीत विद्यालयात दाखल झालो. माझ्या नशिबी विद्या

होती. पण उपाधि नव्हती. त्या काळात काव्य शास्त्राचा थोडासा विचार माझ्याकडून नकळत झाला. पण त्यावर काही पुस्तके वाचणे, बैठक मारून सशास्त्र लेखन करणे माझ्या स्वभावांत नव्हते.

माझी काव्यसाधना फक्त कविता कागदावर उतरविण्यापुरती! प्रयत्न वगैरे लोक कसा व कां करतात हे मला कधीच कळले नाही. मला अनेक कविता डोळ्यांसमोर साक्षात दिसतात! कांहीं वेळां स्वर माझ्या कानी पडतात मग माझे काम फक्त लिहिण्याचे असे. किती ठिकाणी माझ्या कविता कागदाच्या तुकड्यांवर विखुरलेल्या आहेत कोण जाणे!

'छंद लीलावती' मधील रचना ह्या अशाच जाणिव-नेणिवेच्या कक्षेवर असतांना लिहिल्या गेल्या. त्या कविता माझी स्नुषा सौ. सुचित्रा हिने एका वहीत लिहून काढल्या. माझे चिरंजीव मधुसूदन ह्याने एके दिवशी त्यावर स्वहस्ताक्षराने 'छंद लीलावती' असे शीर्षक लिहून टाकले. अर्थात् ही वही पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचे माझ्या ध्यानीमनीही नव्हते. मी रुग्णशय्येवर आहे. सौ. सुचित्रा हिने माझ्या नकळत ही वही मुद्रणास देऊन टाकली. एके दिवशी मुद्रितांची चळतच माझ्या हाती पडली नि माझ्या डोळ्यांत अश्रु तरळले. . .आता शरीरांतली पंचतत्त्वे विस्कटत चालली आहेत. मला मुद्रितांतली फक्त अक्षरे दिसतात. ती वाचणे नि त्यांत दुरुस्ती करणे मला शक्य नाही. माझे बंधुतुल्य स्नेही 'लोकसत्ते'चे संपादक विद्याधर गोखले ह्यांनी 'छंद लीलावती'ला साक्षेपी प्रस्तावना लिहून दिली. त्यांचे आभार कसे मानू? . . .शब्दांच्या दुनियेतून मी आता परत फिरत आहे. तिथे आभाराचे उपचार उरले नाहीत. माझी स्थिती –

**बुद्धिचिया जिभा। बोलाचा न चाखतां गाभा। आखरांचिया चि भांभा। इंद्रियें जींति।** अशी आहे. मालतीच्या कळ्यांनी घ्राणेंद्रिये सुखावतात. नेत्रेंद्रियेदेखिल सुखवतातच की! श्री. विद्याधर गोखले ह्यांची प्रस्तावना मी मुद्रितांत पाहिली कानांनी ऐकली मला चित्तांत संतोष झाला. मी सुखावली.

'छंद लीलावती' पुस्तकबद्ध करणाऱ्या मधुला आणि सुचित्राला माझे आशीर्वाद. आता माझा सर्व भार त्यांच्यावरच आहे. माझे सर्व वाङ्मय मी त्यांनाच अर्पण करतो. आयुष्यभर ह्या दोघांना मी काहींच दिलें नाहीं. मी कमावलेली अ–क्षर संपदा त्यांना देत आहे.

**–सोपानदेव चौधरी**

'छंद लीलावती' हे पुस्तक वाचकांच्या हाती देतांना माझ्या मनाची अवस्था मला वर्णन करतां येणार नाही. हातांत कवितेची वही नि अष्टौप्रहर काव्याच्याच धुंदीत अशी अप्पांची मूर्ती माझ्या मनःचक्षूंसमोरून अद्याप हलत नाहीं.

ह्या पुस्तकाची मुद्रितें मी त्यांना दाखवली तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले. अप्पा मृत्यूपूर्वी दोनतीन वर्षे सतत चिडत होते, रागावत होते. कुणा-कुण्णाचेही ऐकत नव्हते. जेव्हा तेव्हा सूटकेस उघडत आणि कवितांच्या वह्या उस्कटत बसायचे. त्यांना जेवायची शुद्ध नसायची. कपड्यांचे त्यांना भान नसायचे.

'छंद लीलावती' मी छापायला घेते असं जेव्हा मी त्यांना सांगितलं तेव्हा ते हरखूनच गेले. . . 'जे उन्मनियेचे लावण्य । जे तुरियेचे तारुण्य । अनादि जे अगण्य । परमतत्व' ही त्यांची आवडती ओवी ते मोठ्यानं म्हणू लागले ! त्यांनी १०८ ओव्यांची एक छोटी 'ज्ञानेश्वरी' संपादित केली होती. 'छंद लीलावती'च्या ह्या कर्त्याला शेवटच्या काळात 'ज्ञानेश्वरांची ओवी' ह्या एकाच छंदानं भारून टाकले होते. 'छंद लीलावती'चा संकल्प मी त्यांना सांगितला तेव्हा मला यांनी १०८ ओव्यांची ती छोटेखानी प्रत भेट देऊन टाकली. शेवटच्या काळातला अप्पांचा तो एकच चांगला मूड ! पुढे अप्पा संतापलेले होते. जो दिसेल त्याच्यावर संतापायचे. त्यांची ती अवस्था बघून माझ्या डोळ्यांत अश्रू मावत नसत. पुढे पुढे त्याची मला संवयच झाली.

'छंद लीलावती'चा एकच विषय त्यांना थोड्याफार 'मूड' मध्ये ठेऊ शकत होता. पुस्तकाची मुद्रितं त्यांना दाखवली तेव्हाही ते खुलून गेले. 'ज्ञानेश्वरी' मधील तुटक ओव्या ते दिवसभर पुटपुटत राहिले. 'मी प्रस्तावना लिहितो' असे म्हणून त्यांनी कागद-पेन घेतला. एक ओळ लिहिली नि त्यांनी पेन खाली ठेऊन दिला. नंतर दोन दिवस ते मला मजकूर सांगत राहिले. त्यांचे मित्र रमेश झवर हेही अधुनमधून येत राहिले. आम्ही दोघांनी मिळून प्रस्तावनेची मुद्रणप्रत कशीबशी पुरी केली.

पुस्तकास विलंब होत होता. अप्पांची तब्येत खूपच ढासळली. होती. के. इ. एम. मध्ये डॉ. रवि बापट ह्यांनी त्यांना आराम पडावा म्हणून जीवाचे रान केले. थोडे बरे वाटायचे. शेवटी आम्ही अप्पांना घरी घेऊन आलो. आणि एके दिवशी सकाळी अप्पांचे मौन सुरू झाले. त्यांचा राग निमून गेला. सारे कसे शांत शांत झाले. अप्पांची काहीच हालचाल कशी ऐकू येत नाही म्हणून मी त्यांच्या खोलीत डोकावले. मला लक्षण काही धड वाटेना. मी आईला हाक मारली. आई धावतच आली.

अप्पा शांत निजलेले होते. कवितांच्या वह्या असलेली त्यांची सूटकेस उघडीच पडलेली होती ! . . .

'छंद लीलावती'ची प्रत माझ्या हातात पडली नि माझ्या तोंडून शब्द बाहेर पडेना. अप्पांची मूर्ति माझ्या नजरेसमोरून अद्याप हलत नाहीं.

-सौ. सुचित्रा चौधरी

# वृत्त-सूचि


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | अपराजिता | २२ | २० | तृष्णा | ३७ |
| २ | अभंग | ४० | २१ | दिंडी | ४१ |
| ३ | अमृतध्वनि | २७ | २२ | दोहा | ३९ |
| ४ | अनुष्टुप | ४२ | २३ | द्रुतविलंबित | १३ |
| ५ | अश्वघाटी (पहा 'मंदारमाला') | २९ | २४ | नलिनी | ३५ |
| | | | २५ | निर्मला | ३६ |
| ६ | आर्या | ४० | २६ | पुष्पिताग्रा | २३ |
| ७ | इंद्रवज्रा | १५ | २७ | प्रियंवदा | १४ |
| ८ | ओवी | ४१ | २८ | प्रभावती | २८ |
| ९ | ओवी (अष्टाक्षरी) | ४२ | २९ | प्रहरण कलिका | २२ |
| १० | अंजनी | ३९ | ३० | प्रहर्षिणी | १५ |
| ११ | कलिका | ३८ | ३१ | पृथ्वी | २७ |
| १२ | कामदा | १५ | ३२ | फटका | ४० |
| १३ | चामर | २१ | ३३ | भद्रिका | १४ |
| १४ | चंद्रिका | ३७ | ३४ | भुजंगप्रयात | १३ |
| १५ | चंपकमाला | १७ | ३५ | मणिबंध | २२ |
| १६ | जलधरमाला (कल्याणवर्ग) | ३७ | ३६ | मत्तमयुरी | ३८ |
| | | | ३७ | मदनदमन | १९ |
| १७ | जलधरमाला (पद्मावर्त वर्ग) | ३३ | ३८ | मदिरा | २९ |
| | | | ३९ | मयुरी | १६ |
| १८ | जलोद्धतगती | १८ | ४० | मानसहंस | ३३ |
| १९ | तोटक | १८ | ४१ | मायावी | २० |

| | | |
|---|---|---|
| ४२ | मालती | ३५ |
| ४३ | मालिनी | २५ |
| ४४ | माल्यभारा | २४ |
| ४५ | मुक्तछंद | ४३ |
| ४६ | मंगला | ३३ |
| ४७ | मंजुभाषिणी | २८ |
| ४८ | मंदाक्रांता | २६ |
| ४९ | मंदारमाला | २९ |
| ५० | यूथिका | १८ |
| ५१ | रतिलीला | ३२ |
| ५२ | रथोद्धता | १६ |
| ५३ | रमा | २८ |
| ५४ | रागिणी | १५ |
| ५५ | राधिका | ३४ |
| ५६ | रुक्मिणी | ३४ |
| ५७ | रंजन | ३० |
| ५८ | ललना | ३६ |
| ५९ | लंका | ३८ |
| ६० | वसंततिलका | २१ |
| ६१ | विद्युन्माला | ३५ |
| ६२ | विबुधप्रिया | ३१ |
| ६३ | विभावरी | ३४ |
| ६४ | वियोगिनी | २३ |
| ६५ | विलासिनी | २० |
| ६६ | श्यामा | २० |
| ६७ | शार्दुलविक्रीडीत | २६ |
| ६८ | शालिनी | १३ |
| ६९ | शिखरिणी | २५ |
| ७० | शैलशिखा | ३२ |
| ७१ | सती | ३६ |
| ७२ | साकी | ४१ |
| ७३ | सारंग | १६ |
| ७४ | सुकेशी | १९ |
| ७५ | सुधाकलश | ३१ |
| ७६ | सुरत ललिता | ३० |
| ७७ | स्त्रग्धरा | २४ |
| ७८ | स्त्राग्विणी | १७ |
| ७९ | स्वागता | १४ |
| ८० | हरिणी | २१ |
| ८१ | हरिणीप्लुता | २३ |
| ८२ | हंसी | १७ |

## द्रुत विलंबित

(अक्षरें १२, गण– न भ भ र, य. पा. ७–१)

नभ भरे बघ रे घन हे किती
फिरत मंदगती रवि झांकिती
द्रुतगती चपला चमके अहा !
'द्रुतविलंबित" खेळ नभी पहा.

## भुजंगप्रयात

(अक्षरें १२, गण– य य य य)

यमाच्याच धाडी य-चारी गणाला
मुखीं वीष बारा जिभा कालियाला
अगा कालियाची जलीं केलि माती
हरी खेळला तो "भुजंगप्रयाती"

## शालिनी

(अक्षरें ११, गण– म त त ग ग)

शीलाची जी रुद्रसंचीत माला
माता ती गंगाच लेई गळ्याला
अंगी बाणे मूर्त शालीनताच
"शालीनीला" कोठला पेंचपाच !



ग्रहालय
२४६५
दा. क्र. २००६९

## प्रियंवदा

( अक्षरें १२, गण– न भ ज र )
रविमिते मजसि अक्षरी जडे
दिनकरा कितिक आळवूं गडे
नभ जरा वरुनि हांसतां तदा
'प्रिय' वदे धरणि ही "प्रियंवदा"

## स्वागता

( अक्षरें ११, गण– र न भ ग ग )
रानजाइ किती ही दिलदार
रानभृंग गमती तिज प्यार
नम्रता सहज वाणत देहीं
"स्वागता" करित स्वागत गेहीं

## भद्रिका

(अक्षरें ११, गण– न न र ल ग)
चल दिन नुरला गडे अता
गिरिधर घरिं आज ये स्वतां
उजळिल प्रभु सर्व द्वारका
हरिसह मग मीहि "भद्रिका"

## कामदा

(अक्षरें १०, गण– र य ज ग)

इंद्रियें दहा झोंपली किती
राय जाग रे जाग तूं पती
देह जाळिते कोण मी वदा ?
मीच कामिनी पूर्ण "कामदा" !

## प्रहर्षिणी

(अक्षरें १३, गण– म न ज र ग)

रानीं या खग मधु गान गाति रागे
सौख्याचे स्मरण करी मनी जरा गे
प्रेमाने कवन सखी सहर्ष गाती
हर्षाची महति वदे "प्रहर्षिणी" ती !

## इंद्रवज्रा

(अक्षरें ११, गण– त त ज ग ग)

ती तेजगंगा नव्हती नभांत
कीं भानु तोही दडला ढगांत
तेव्हां चकाके बिजली दिगंती
ती "इंद्रवज्रा" फिटवीत भ्रांती !

## रथोद्धता

(अक्षरें ११, गण– र न र ल ग)

तें निशाण चढवी रथावरी
रे नरा लगभगा चढे हरी
सारथी सजूनि येत तत्वतां
वीर अर्जुन करी "रथोद्धता"

## मयुरी

(अक्षरें १०, गण– म म म ग)

मेघांची दाटी हो मेघावाणी
'म्यों म्यों म्यों' गा "मोरा" आतां रानीं
पायीं बांधीली दाहा नूपुरे
नाचा नाचा लुटा मोदासी रे

## सारंग

(अक्षरें १२, गण– त त त त)

बारा असे वेळ चाले इथें नाच
'तो तों त तों" गात साधा तराणाच
तापे जरी सूर्य गानीं भरे रंग
वृक्षावरी रंगला पक्षि "सारंग"

## चंपक–माला

(अक्षरें १०, गण–भ म स ग, यति–५-५)

ही दशपुष्पें तोडुनि घेसी
गुंफित माला भूमिप गाशी
कोण गळा ही शोभत बोला
चंपक-माला ! "चंपक-माला" !

## हंसी

(अक्षरें १०, गण–म भ न ग–अर्ध महाक्रांता)

कासारीं या नवल घडतां
मी भाना गे हरवित अतां
मौक्तिकांचे अशन कवणा ?
"हंसी" लागी नित मिळत ना ?

## स्त्राग्विणी

(अक्षरे १२, गण– र र र र)

घउनि रज्जु चारी रकारांतला
गुंफि बाराच ही मौक्तिके प्रेमला
तेज तें जातसे नेत्रि या कोंदुनी
येथ तेजस्विनी शोभते 'स्त्राग्विणी'

## यूथिका

(अक्षरें १२, गण– र न भ र, यति–३–९)

कोण रानभरि हिंडत या गुणी
यूथ हा दिसत द्वादश हस्तिनी
ती पुढें निजमदें गजनायिका
चालली डुलत डोलत "यूथिका"

## तोटक

(अक्षरें १२, गण– स स स स)

कशि चालत ऐटित चाल पहा
सु सु सूं सखि फुंकुनि मंत्र अहा
नित वंदित दैवत भानु–शशी
बघ टाकित "तोटक" जादु अशी !

## जलोद्धतगती

(अक्षरें १२, गण–ज स ज स, यति ६–६)

अडे जसजसी जला अडवुनी
पुढे मग तशां मदांत तटिनी
विशाल जलधी मिळेल पुढती
निघे खळखळां "जलोद्धतगती".

नारी वर्ग **मदन दमन**

(अक्षरें ११, गण– न न न ल ग)

असिम शरण जगति सदा
करुनि भजन नमित पदा
अशन शमन वरित वनीं
'मदन दमन' करिति मुनी

क्रीडावर्ग **सुकेशी**

(अक्षरें ७ गण–य र ग)

गमावे भृंग जैसे
सखीचे केश तैसे
बघोनी पुष्प राशी
मनीं घाली "सुकेशी !"

पुष्प वर्ग **रागिणी**

(अक्षरें १३, गण--र स ज ज ग, य. पा. ५-५-३)

चाखिला **रस जो जगीं** तव संगिती
धन्य त्या श्रुति ! गुंग त्यांतच मन्मती
हांसते क्षणि नाचते जणूं भामिनी
रंगवी स्वप्न रंजवी मन "रागिणी"

**नगाणिका वर्ग** ***विलासिनी***

(अक्षरें ११, गण--ज र ज ग ग)

सुहासिनी धरा खरी शुभांगी
नवे नवे विलासते तदंगी
तशांत त्यांत मी बघा वसंती
विलासते 'विलासिनी' दिगंती

**धारी वर्ग** ***श्यामा***

(अक्षरें ८, गण–त स ल ग, य. पा. २-५-१)

काळोख वसनावरी
तारे गमति भर्जरी
चंद्रा विरहिता जरी
"श्यामा" रजनी साजरी

**सावित्री वर्ग** ***मायावी*** **(७ जगत्बंध वृत्त)**

(अक्षरें १५, गण-म य र म म, य पा. ४-४-४-३)

अंधारांत दुष्कर्मेंच सारा वेळ चिंतावा
दीनांचाच वाली एक ऐसा आव आणावा
माया झूट पाडी फूट संसारांत गोसावी
बोले एक चाले एक ऐसा देख "मायावी"

## हरिणी

(अक्षरें १७, -- न स भ र स ल ग, यति--१०-७)

सतत तुझिया सान्निध्याला, अशी सहवासिनी
न **समरसलांगा** माझ्याशी, अशी मम वैरिणी
उमर सतरा हे धोक्याचे असे म्हणती जनी
त्यजुनि 'हरिणी' मायाजाली निघाल कसें रणी ?

## वसंततिलका

(अक्षरें १४, गण-त भ ज ज ग ग)

गेली चतुर्दश वनीं वरुषें निघोनी
श्रीराम **तो भज जगीं गुण** गाइ गानीं
आला गृहीं अवधपूर खुलूनि गेले
धाली "वसंततिलका" धरणी डोले

## चामर

(अक्षरें १५, गण--र ज र ज र)

**रंजरंज** रंजवोनि नील गाय काननीं
आणिला घरी सुरेख पुच्छ गुच्छ वेधुनी
रौप्यदंड लाभतांच भाग्य येत पामरा
भूपती शिरीं धरी करांत दूत 'चामरा'

## प्रहरण-कलिका

(अक्षरें १४, गग-म न भ न ल ग, यति–७-७)

अलिगण उठला उपवनिं भ्रमतां
"ननभनलग" ही गुणगुण करिता
थबकत परि हे परतत अलि कां ?
मनि वरमत त्या "प्रहरण-कलिका !"

**गांधर्वी वर्ग** ## मणिबंध

(अक्षरें ९, गण- भ म स)

लेवुनि **भामा साज** गुणी
लाजत गेहीं येत कुणी
मागुनि स्वामी येइ घरीं
तो "मणिबंधा" वट्ट धरीं

**अपरा–वर्ग** ## अपराजिता

(अक्षरें १४, गण- न न र स ल ग, यति–७—७)

न नर सलगी दावी त्यांसहि वेधिले
प्रणय बघुनि थोर गाधिज ही भुले
स्वनयन-शर मेनका रति फेंकिता
विजयी गमत कां अशी "पराजिता" !

अर्ध समवृत्त **वियोगिनी** (वैतालीय)

(चरण १ वर अक्षरें १० गण स स ज ग) | (चरण २ व ४ अक्षरें ११) (गण – स भ र ल ग)

नित **सोस जगीं** वियोग हा
**शुभ रे लगनी** घडी अहा
दश दीस कांतासि सोडुनी
अकराव्या दिनिं ये 'वियोगिनी'

## हरिणी प्लुता

(विषम– स स स ल ग अक्षरें ११)
(सम – न भ भ र अक्षरें १२)

विषमीं **नससी सलगी** दिसे
द्रुत विलंबित वृत्त समीं वसे
विषमीं शिव अक्षरिं बांधितां
सहज नाचत ये 'हरिणी प्लुता'

## पुष्पिताग्रा

(विषम अक्षरें १२, गण – न न र य)
(सम अक्षरें १३, गण– न ज ज र ग)

**ननरय** विषमी गणांत राही
**नजजर ग** क्रम तो समांत त्याही
द्विदश विषमी अक्षरें समग्रां
त्रिदश समीं अशि हीच 'पुष्पिताग्रा

## माल्य भारा

(गण—स स ज ग ग)

वियोगिनी वृत्ताच्या प्रत्येक चरणाच्या शेवटी एक गुरु अक्षर ठेविलें तर "माल्य भारा" वृत्त तयार होते.

## "स्रग्धरा"

(अक्षरे २१, गण—म र भ न य य य, यति ७, ७, ७)

झाला आनंद लोकीं, विजय मिळवुनी
येत वीर गृहासी

मी रंभा ना यथां या, गमत शुकदिनीं
बोलते जी स्वतांशी

नाहीं नाहीं कुणीही मजसम दुसरी!
आज सौंदर्यवान

लेवूनी तोरणासी सहजचि वदली
"स्त्रग्धरा" भाग्यवान

## शिखरिणी

(अक्षरें १७, गण य म न स भ ल ग)

सदा आधी व्याधी सहन करि जी
सप्तशत ये
यमाने संभूला गरल दिधले
मृत्यु नच ये
पहा गेली गेली अवघड असे
घाट क्रमुनी
विराजे ध्येयाचे शिखर चढली
ती "शिखरिणी"

## मालिनी

(अक्षरें १५, गण—न न म य य, यति—८·७)

रति जणु गुणशाली
गोड जात्या स्वभावी
उमलति कळि बाला
पंधराची असावी
"न न म य य" मुखींची
बोवडी ती वळाली
थबकत पथिं चाले
"मालिनी" साधी भोळी !

## शार्दूलविक्रीडित

(अक्षरें १९, गण–म स ज स त त ग, यति–१२ ७)

शौर्यानें जित **मांस जे सतत गा**
भक्षूनिया गर्जतां
रानी राज्य करी तया वनपशू
सम्राट की मानिती
सत्ता गाजविणे, जगीं मिरविणे
स्वातंत्र्य आबाधित
केव्हा होईल भारता जगिं तुझें
"शार्दूलविक्रीडित"

## मंदाक्रांता

(अक्षरें १७ गण–म भ न त त ग ग,यति–४-६-७)

मी भानूतें गगनिं बघतो
मंद चालीत चाले
या वृत्ताला असति चरणें
चार तैसेंचि हाले
कूर्माची ही खचित गमते
मंदशी चाल फार
"मंदाक्रांता" मजसि गमते
पूर्ण कूर्मावतार !

## पृथ्वी

(अक्षरें १७, गण–ज स ज स य ल ग)

फिरे गरगरा धरा
सतत अंतराळांतुनी
चराचर हिच्यासवें
तरि–अधांतरी राहुनी
खरोखरीच ही क्षमा
सहज वृत्ति ही आंतली
तिची महति गातसे
म्हणुनि "पृथ्वि" वृत्तांतली !

## अमृत-ध्वनि

(अक्षरें २२, गण–त भ य ज स र न ग, यति–४-७-७-४)

देहांत संचरत स्नेहास आचरित
मोहास आदरितसे
पुंगीस त्या श्रवुनि, गुंगीत त्या रमुनि
नागेंद्र डोलत दिसे
बावीसही श्रुतित, रागांचिया गतित
तो बीन नादत उठें ?
रानांत या कुठुनि संगीत ये श्रवणि
हा " अमृत–ध्वनि" कुठें ?

## रमा

(अक्षरें १५, गण—न ज न र य, यति ५—१०)

गवळणि गोकुळि **निजनारि या** गृहासी
गिरिधर तो निवडुनि घेत पंधरासी
पहुडत त्यांसह मुर शेषशायि लोका
विलसत त्यांतिल चतुरा "रमा" विलोका

## प्रभावती

(अक्षरें १३, गण—ज भ स ज ग, यति—४-९)

मनास हा क्षण **मज भास जाग** रे
जनास कोण वदतसे उठा त्वरें
असा प्रभाव नित दिसे जगाप्रती
प्रभाव पूर्ण दावितसे "प्रभावती !"

## मंजुभाषिणी

(अक्षरें १३, गण—स ज स ज ग ७-६)

सज सज गे सजुनि काय आणिशी
सजणे **त्रयोदश** गुणी विडा मसी
तव बोल त्यांतुनी मधू सुहासिनी
मधुरा गिरा रमवी 'मंजुभाषिणी'

## मंदारमाला (अश्वधाटी)

(अक्षरें २२, गण—त त त त त त त ग, य.—४-६-६-६-६)

ही अश्वधाटी गणावी कुणी—
नित्य तालांत अश्वापरी चालली
कोणी असो ही मला भावना—
पूर्ण काव्यांत निभ्रांत वाटे भली
"ताताता ताताता तीगा" अशी
तोतरी मात्र अष्टोगणी बोलते
"मंदारमाला" लळा लावुनीया
गळां शंकराच्या सदा शोभते

## मदिरा

(अक्षरें २३, गण—भ भ भ भ भ भ भ ग ग, य.—६,६,६,५)

अक्षर मीति पहा तुज तेविस
दाविल चार पदीं मदिरा ती
सात भ नामक ते गण नंतर
दोन गुरु मग येतिल अंतीं
मस्तित खेळत, धुंदीत नाचत
बोलत डोलत झिगत येते
रंजविते जनिं गायनि रूपच
लाभत मादक त्या "मदिरेते"

**कामोन्मता वर्ग** **रंजन**

(अक्षरें २६, गण—भ न ज न स न न भ ग ग, य.—७,७,७,५)

गुंगत अलिगण, डोलत उपवन
चालत छुम छुम त्यांतच कोणी
मोहवि अवचित हो तनु पुलकित
मन्मन भुलवित लोभस वाणी
तों त न न न न न न, झुं झ न न न न न
छुं छ न न न न न गायन चाले
हांसत अनुनय नाचत अभिनय
थय थय थैं करि "रंजन"बाले

## सुरत ललिता

(अक्षरें १६, गण— म न स त र ग, यति—९—७)

पाहोनी मदन रतिच्या
त्या गोडशा तरंगें
मत्प्रीती निशिदिनीं अहा
**मानसांत रंगे**
हेलावे मजसह सखी
अतःपुरांत पाही
एकांती "सुरत-ललिता"
निःसंग रंगते ही

## सुधा-कलश

(अक्षरे २६, गण- न ज भ ज ज ज भ ज ल ग,
यति- ५, ६, ६, ६, ३)

सुख सुख ते कशासि म्हणती
वघ दुःख किती उगाच कुढतां कसले ?
मनि विरले, जनांत उरले
रमति सगळे दुःख सुखमिषें हंसले
रसरसल्या बघ नवरसा
जनिं वा विजनीं वदा कवण ते वरिती
कवि भरिती शिगोशिग किती
रसिका बघ रे "सुधाकलश" हे जगती

## विबुधप्रिया

(अक्षरे १८, गण- र स ज ज भ र, यति ९-९; ३-१-५-५)

वानिता तव दिव्यवाणी
खरोखरी हरते मती
बैसले विश्वब्रुप्रशांत
करि विहार सरस्वती
चाखिला रस जो जिभीं
रुचत पहा स्मरुनी तया
सांगते अठरा पुराणें
विराजत "विबुधप्रिया"

## मणि कल्पलता वर्ग शैलशिखा

(अक्षरे १६, गण– भ र न भ भ ग)

साद उठे घना ! बरस रे चल येइ कसे
**भार नभीं भ गं** गडगडे, मज लावि पिसे
तोच्र कुठें क्षणांत वच ये अशि बोलसि कां ?
मीच धरी घनांस नभिच्या, शिरि "शैलशिखा"

## सन्मणिमाला वर्ग रतिलीला

(अक्षरें १९, गण– जस जस जसग, य. पा. ६–६–७)

[या वृत्ताच्या आरंभी पहिल्या बारा अक्षरांत (६-६ यति) जलोद्धतगति हें वृत्त येऊन जाते. त्यापुढे ज. स. ग. हे गण जोडले म्हणजे रतिलीला हें वृत्त तयार होते.]

विलोल नयना सुहास्य वदना पहा कवण नारी
विलास करि **राजसाजसजसी गमे** सुखद भारी
क्षणांत हंसणे, क्षणांत रुसणे क्षणांत किती लीला !
कुणा न भुलवी करीत असतां विहार "रतिलीला !"

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्रा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

गौ वर्ग **मंगला**

(अक्षरें १६, गण– न भ जज जग, य. पा. २-८-६-२)

वितरि गौरिवरदा सतिला पति देणगी
खरिच ती समज गे ललनें भजनी जगी
सतिसवें नित पती नवप्रीतित रंगला
मग घरीं भयहरी करि मंगल "मंगला"

(मंगला या वृत्तांतील पहिली चार अक्षरे सोडली म्हणजे पुढील बारा अक्षरांत "द्रुतविलंबित" वृत्त येते. त्यामुळे सहजपणे या वृत्ताला द्रुतविलंबित-डौल येतो.)

पद्मावर्त वर्ग **जलधर-माला**

(अक्षरें १२, गण– म भ स म, य. पा. ४-६-२)

आशा तृष्णामय वसुधेते बाही
आकाशीं तो वरुण दयेने पाही
आंसू वेगें टपटप येतां ओठीं
झाली त्यांची "जलधर माला" कंठी

सोमप्रिया वर्ग **मानस हंस**

(अक्षरें १५, गण–स ज ज भर, य. पा. ५-५-५)

सुविचार मौक्तिक मानसीं वध प्रेमले
मज हेंच रम्य तडाग पाहुनिया भुले
नित खाउनि नव मौक्तिका मधु बोलतो
हरि भान "मानसहंस" हा हृदीं डोलतो

## राधिका

(अक्षरें १२, गण—र र र र, यति-६-१) आद्याक्षरे चार 'र'

रंग खिळे हरी अंतरंगातले
रंगलेले वरी जे अनंतांतले !
रंगवेडया दिशा दंगल्या साधिका
रंगल्या भक्तिरंगात की राधिका

## विभावरी

(अक्षरें १३, गण—न भ ज ज ग, य. ८--५)

वय त्रयोदश उभी गिरिच्या नगी
हळूच या हळूच या नभीं जा जगीं
रजनि ही तनुवरी पट सावरी
करित यौवन-विलास " विभावरी "

## रुक्मिणी

(अक्षरें १४, गण– ज भ ज स ग ग, य. ६--८)

मिळे अहा सति भुवनेश्वरी हरीसी
तसा हरीपरी पति लाभला कुणासी ?
सुदर्शनें अरि-शिशुपाल मर्दियेला
खरा सखा सुखनिधि कृष्ण "रुक्मिणी"ला

## मालती

(अक्षरें १२, गण-- न ज ज र)

सतत जिचा मुखचंद्र हांसरा
मृदुल अशा शयनीं निजे जरा
भ्रमर सखे हळुं येती गुंगती
उठत झणीं प्रणयांत "मालती"

## विद्युन्माला

(अक्षरें ८, गण— म म ग ग, य. ४-४)

आभाळींची मेघावाला
बोले "मा मा गा गा" आला
"विद्युन्माला" शोभे कंठी
कोणा लागूं नेदे दीठी

भ्रमरी वर्ग

## नलिनी

(अक्षरें ६, गण स, स, य. पा. २—४)

किती गोड पहा
सुसमागम हा
अलि ये भुलुनी
विकसे "नलिनी"

## सती

**कन्या वर्ग**

(अक्षरें ५, गण—ज ग ग)

पती वियोगें
गती जगीं गे ?
चितेत घाली
"सती" निघाली

## निर्मला

**विद्युन्भ्रांता वर्ग**

( अक्षरें ७, गण— स ज ग, )

बघ ती दिसे जगीं
वरि पाहे रे नगी
झरतेच प्रेमला
झुळझूळ "निर्मला"

## ललना

**रुपोन्मत्ता वर्ग**

(अक्षरें १२, गण— भ म स स)

बोलत भामासंगति डोलत ये
रंगत दोघे हांसुनिया प्रणयें
हा नरनारी संगम मोहि मना
गे हृदयंगम तूच खरी "ललना"

## तृष्णा

**विद्युल्लेखा वर्ग**

(अक्षरें ८, गण— न य ल ल)

**ती ये ललना** लाजत
आशामय हें जीवित
पी पी मनुजा संतत
"तृष्णा" कधि ना संपत

## जलधर माला

**कल्याण वर्ग**

(अक्षरें १२, गण— म भ स म, य. पा. ४-६-२)

आशा तृष्णामय वसुधेतें बाही
आकाशीं तो वरुण दयेनें पाही
आंसू वेगे घळघळ येतां ओठीं
झाली त्यांची "जलधर माला" कंठीं

## चंद्रिका

(अक्षरें १३, गण—न न त त ग, यति–७-६)

प्रखर किरणिं गे पृथ्वि ही नाहली
दिनमणि सरतां सांज ती जाहली
हळुहळु गगनीं येतसे चंद्र कां ?
उधळित जगतीं चंद्रमा "चंद्रिका"

## मत्तमयूरी

(अक्षरें १३, गण— म त य स ग, य. पा. ४-९ )

आंब्याचा मोहर लागे बहराया
मोरासंगे जाय मयूरी विहराया
स्वप्राणाने घेत जणूं चित्त भरारी
नाचे ऐसी धुंद वनीं "मत्त मयूरी"

## कलिका

**तार वर्ग**

[अक्षरें १०, गण—र म स ग, य. पा. ३.७ (३, ५, २)]

साजणी जाऊं या फुलबागां
त्यास ती दावीता अनुरागा
तोंच ते आले हो अलि कांही
देखतां हेलावे "कलिका"ही

**लघुमालिनी वर्ग**

## लंका

(अक्षरें ११, न भ भ ग ग, य. पा. ४-६-१ किंवा ४-७)

हरुनि रावण जानकि नेतो
गरजला नभ भाग गमे तो
रघुपती बध गाजवि डंका
पुनित जाहलि त्यांतच "लंका"

# मात्रा-वृत्ते

## अंजनी

जेव्हां मारुति जन्मा आला
गेला सूर्या ग्रासायाला
गात अंजनी शिशुच्या लीला
"अंजनी-गीतच" तें

## घनाक्षरी

घन आकाशीं गर्जती
वितळोनी आंसू होती
"घनाक्षरीच"
"घनाक्षरीच" वर्षती
प्रक्षाळिती वसुधा

## दोहा

भक्ति सुधा पाजावया कबीर, तुलसीदास
काव्य धेनू दोहूनिया, "दोहे" देति जनांस

## आर्या

रामायणें लिहियली, सहस्र त्या धन्य धन्य कविवर्या
पंडित मयूरपंतें खेळविली गात गात ती 'आर्या'

## फटका

संसारामधि लक्ष न ज्याचे
परमार्थ करी जो लटका
विधी अशाच्या पाठीवरती
एक एक मारी "फटका"

## अभंग

संत महात्म्यांनी देव आळविला
ऐकूनी द्रवला भक्तगण
संत वचनांची कळाली महती
ठाकला पुढती पांडुरंग
तुका, नामा, जनी म्हणोनिया गेले
बोल ते ठरले अभंगची
असो रंकराव, सज्जन कुटाळ
"अभंगाची" ओळ त्याचे मुखीं

## ओवी

ज्ञानोबा मुक्तेश्वराची करणी
बोध आख्याने ज्ञानामृत वाणी
" ओवीत " ओवुनी कवि रायांनी
केले ऋणी भाविकांसी

## दिंडी

राज-मार्गी चालले कोण बाई
दार थोडे उघडूनि जरा पाही
अशीं डोकावे युवा राजबिंडी
जिच्या योगे शोभली आज " दिंडी "

## साकी

वसला धुंदित, सन्निध त्याची
प्रिया मोहनी टाकी

देत सुरेचा एक एक तो
प्याला भरुनी ' साकी '

## ओवी अष्टाक्षरी

संसाराचे मनोगत
द तांना घरघरे
उमटली हो जात्याच
जात्यावरी अष्टाक्षरे

............ .......

वीणा नांदता अंतरी
झाल्या संगीताच्या कळा
घाम गातां, ओवीनें
नवा साम निर्मियला

## अनुष्टुप (आदिछंद)

अनुष्टुप आदि-छंद
गीर्वाणीतील निर्मिती
अष्ट दिशा व्यापुनीही
अष्टाक्षरांचीच मिती

# मुक्त छंद

(मुक्त छंदासंबंधी छंदातच लिहावं लागलं, याबद्दल क्षमस्व )

प्रासां चढवूं या फासावर
यमके धाडूं यमसदनाला
मती पाठवूं रतीकडे अन्
चरणां चरणां ठोकुनि नाला

श्लेषांची तर ठेचूं तोंडे
लघु-गुरु मात्रा गेल्या वाया
इथें न मात्रा चाले आतां
गणांस देखिल दणकावूंया

वृत्त अतां निवृत्त जाहले
नष्ट करूं त्या जाती आतां
उभे विषुववृत्तावरि राहुनि
लिहूं मुक्तछंदी नवकविता !

**लक्षण** :– मुक्त छंद मुक्तछंद

नसे त्याला धरबंध
गती शीघ्र गती मंद
सारे कांही अंदाधुंद
इथें लय जाते लया
बेतालाचीच किमया
सांगा ऐशा बेबंदाचा
कैसा व्हावा बरें छंद ? जळ्ळें लक्षण !

## उदाहरण

"उन्हांत झिरमिळच्या थंडावल्या गद्दड
रक्त पांढरे वाजे खडकन तेंही मद्दड
प्रज्ञा धडकन् खडकाची पण–
व्याली प्रज्ञेच्या व्यालांतुन
ढंग ढंगळ, गढूळले ते !"

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९९५
दा. क्र. २७०.६७
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0024061
REFBK-0024061

मराठी सारस्वतांत काही स्त्रियांनी
काव्यातील छंदावर लिहिले आहे
सांगीतिक टीका प्रमुख ग्रंथ म्हणजे
कविवर्य माधव ज्यूलियन यांचे छंदोरचना।
हे या छंदरचनांतील
[illegible] मी रचना जात नाही, असे वाटते
पुस्तक आहे. त्यात ओढून वाचून ~~आवडले~~
आवडले. असेही थोडे फार आहे. [illegible]
[illegible] मोठ्या ग्रंथांत ते सारच आहे
सामान्यतेही हो [illegible] ग्रंथाची [illegible]
लिहिली आहे. सार्थकता या [illegible]
इथेच आलेली आहे. [illegible]
[illegible] नाही.
~~[illegible]~~ पोटी होते
तेच ओढी आले